नि. फौ. मा. क्र. ११३/२०१९
शासन–वि–सुदर्शन,
निशाणी क्रं. १७

**सदर साक्षीदाराला देवा शपथ खर सांगेन अशी शपथ दिली असता, त्याने वारंवार फक्त देवा शपथ असे म्हटले.**

**सरकार तर्फे सा. क्र.१ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांवः गजानन सुरेश नेवारे,
वयः ४२ वर्षे, धंदा– मजुरी,
रा. गोदाम फैल, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ.

**सरतपासणी श्रीमती एस. एस. कांबळे, सहा. सरकारी वकीलांमार्फत**

दि. ०३/०८/२०१८ रोजी पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलाविले. मला सही करण्यासाठी बोलाविले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर मला माहीत नाही. त्यास सहीपुरता **नि. क्र. १८** देण्यात येते.

**०२. साक्षीदार फितुर झाल्यामुळे सरकारी वकीलांनी कलम १५४ भारतीय पुरावा कायद्यानुसार त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. ती देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०८/२०१८ रोजी पोलीसांनी मलाएल.आय.सी. चौक, यवतमाळ येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तो मला वाचून दाखविला व म्हणून मी त्यावर सही केली. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**०३. उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. वाघ– नाकारला.**

**०४. फेर तपासः–** काही नाही.

वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.07.28 16:57:20 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक २८/०७/२०२५.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ